**ठळक बातम्या**

- सातार्‍यातून भाजपाकडून उदयनराजे भोसले यांना उमेदवारी जाहीर

- सोलापूर, कोल्हापूर, हातकणंगलेत महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे अर्ज सादर

- अभिनेता सलमान खान याच्या घरावर गोळीबार करणार्‍या दोघांना गुजरातमधून अटक

**आणि**

- मुंबई आणि उपनगरात आजही उष्णतेची लाट कायम रहाण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

भाजपानं सातारा लोकसभा मतदारसंघातून छत्रपती उदयनराजे भोसले यांना उमेदवारी आज जाहीर केली. गुरुवारी अर्ज भरणार असल्याचं आज त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. २०१९ च्या निवडणुकीत ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकीटावर निवडून गेले होते. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यत्वाचा आणि खासदारकीचा राजीनामा देऊन भाजपात प्रवेश केला होता. पुन्हा झालेल्या लोकसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे श्रीनिवास पाटील विजयी झाले होते. सध्या ते राज्यसभेचे खासदार आहेत. रत्नागिरी-सिंधुदुर्गमधला महायुतीचा उमेदवार मात्र अजून जाहीर झालेला नाही. याठिकाणी शुक्रवार ही अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे.

दरम्यान, सोलापूर लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांनी आज अर्ज भरला. त्यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांनीही आज अर्ज भरला.

यावेळी आमदार सुभाष देशमुख, माजी आमदार राजन पाटील यांच्यासह भाजपाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

माढा लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनीही आज अर्ज भरला. यावेळी संजय शिंदे, शहाजी पाटील बबन शिंदे, जयकुमार गोरे हे आमदार उपस्थित होते.

कोल्हापुरातून काँग्रेस उमेदवार शाहू महाराज यांनीही आज उमेदवारी अर्ज भरला. यावेळी आमदार सतेज पाटील आणि माजी आमदार मालोजीराजे छत्रपती उपस्थित होते.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार सत्यजित पाटील सरूडकर यांनीही आज उमेदवारी अर्ज दाखल केला. शरद पवार यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह मानसिंगराव नाईक, राजूबाबा आवळे हे आमदार, माजी मंत्री राष्ट्रवादीचे नेते शिवाजीराव नाईक, माजी आमदार सुजित मिणचेकर यांच्यासह अनेक ने◌ते यावेळी उपस्थित होते.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज मशाल गीताचं अनावरण केलं.

**<><><><><>**

बहूजन समाज पार्टीनं लोकसभा निवडणूकीसाठी आपल्या ११ उमेदवारांची घोषणा केली. वाराणसी मधून भाजपाचे उमेदवार आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विरोधात अतहर जमाल लारी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मैनपुरी मधील उमेदवारही बदलण्यात आला आहे.

**<><><><><>**

राजस्थान मधल्या बहुजन समाज पक्षाचे आमदार जसवंत सिंह आणि मनोजकुमार राठोड यांनी  काल रात्री बाळासाहेब भवनात येऊन शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.  त्यांचे पक्षात स्वागत करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

<><><><><>

चित्रपट अभिनेता सलमान खान याच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणी काल पोलिसांनी दोन आरोपींना गुजरामधून अटक केली. विक्की गुप्ता आणि सागर पाल अशी अटक केलेल्यांची नावं आहेत. रविवारी सलमान खानच्या घरावर गोळीबार केल्यानंतर हे दोघं फरार झाले होते. त्यांच्या शोधासाठी मुंबई पोलिसांची १५ पथकं ठिकाठिकाणी गेली आहेत. त्यातल्या एका पथकानं या दोघांना अटक केली. पोलिसांनी हल्ल्यासाठी वापरलेली मोटारसायकलही जप्त केली असून हल्लेखोर ज्या घरात भाडेकरु म्हणून राहात होते त्याचा पत्ताही मिळवला आहे. सलमान खानच्या घरावर या दोघांनीच गोळीबार केल्याचं मुंबई पोलिसांनी स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

श्रीलंकेत दहा हजार टन कांद्याची निर्यात करायला केंद्र सरकारनं परवानगी दिली आहे. संयुक्त अरब अमिरातीलाही अतिरिक्त दहा हजार टन कांद्याच्या निर्यातीला परवानगी देण्यात आली आहे. परदेशी व्यापार महासंचलनालयानं या संदर्भातली अधिसूचना जारी केली आहे. संयुक्त अरब अमिरातीमध्ये याआधी २४ हजार ४०० टन कांद्याची निर्यात करण्यात आली होती. राष्ट्रीय सहकारी निर्यात लिमिटेडच्या मार्फत ही निर्यात केली जाणार आहे.

<><><><><>

गेल्या आर्थिक वर्षात देशातून विक्रमी ७७७ अब्ज डॉलरपेक्षा अधिक निर्यात झाल्याचा अंदाज केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं व्यक्त केला आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ही निर्यात थोडी जास्त आहे.
गेल्या आर्थिक वर्षात आयात ८५४ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाल्याचा अंदाज आहे. त्यामुळं व्यापार तूट ७८ अब्ज डॉलर इतकी राहिली. २०२२-२३ या आर्थिक वर्षात ही वित्तीय तूट १२१ अब्ज डॉलर होती.

<><><><><>

ख्यातनाम कर्नाटकी संगीतकार पद्मश्री के.जी. जयन यांचं आज त्रिपुनीथुरा इथं निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. जयन हे त्यांच्या भक्तीगीतांसाठी प्रसिद्ध होते. त्यांनी अनेक मल्याळम आणि तमिळ चित्रपटांसह १ हजार हून अधिक गीतांना संगीत दिलं आहे. त्यांचे जुळे बंधू के.जी.विजयन यांची ही संगीतकार जोडी जय विजय बंधू म्हणून दाक्षिणात्य चित्रपट सृष्टीत गाजली होती. त्यांना पदमश्री तसचं केरळा संगीत अकादमीसह अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.

**<><><><><>**

काश्मीर खोऱ्यात श्रीनगर जवळच्या झेलम नदीपात्रात आज सकाळी  बोट उलटून चार जणांचा मृत्यू झाला. या बोटीतून लहान  आणि अल्पवयीन मुलांना नेलं जात होतं. जिल्हा प्रशासनानं  जलद गतीनं बचाव कार्य सुरु केलं आहे आणि  या घटनेत आणखी तीन जणांवर श्रीनगरच्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत, अशी माहिती  श्रीनगरचे उपायुक्त बिलाल मोहिउद्दीन यांनी दिली आहे.

**<><><><><>**

ओडिशातल्या जयपूर जिल्ह्यातल्या एका पुलावरून  बस खाली कोसळून काल रात्री झालेल्या अपघातात  एका महिलेसह पाच जणांचा मृत्यू झाला, तर ३५ जण जखमी झाले.

**<><><><><>**

बांग्लादेशातल्या  फरीदपूर जिल्ह्यात  ढाका -खुलना महामार्गावर  आज सकाळी एका बस आणि पिकअप ची  समोरासमोर टक्कर होऊन झालेल्या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये पिक अप मधून प्रवास करणाऱ्यांचा समावेश आहे. १३ पैकी ११ जण जागेवरच मृत्युमुखी पडले, तर अन्य दोन जणांचा रुग्णालयात उपचारांदरम्यान मृत्यू झाला.

**<><><><><>**

कुवेतचे नवे प्रधानमंत्री म्हणून अहमद अब्दुल्ला अल-अहमद अल-सबाह यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माजी प्रधानमंत्री शेख मोहम्मद सबाह अल-सालेम अल-सबाह यांनी सात एप्रिलला राजीनामा दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. ४ एप्रिलला झालेल्या निवडणुकीनंतर शेख मोहम्मद यांनी ६ एप्रिललाच आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा सादर केला. त्यानंतर शेख अहमद यांची नियुक्ती झाली आहे. नवनियुक्त प्रधानमंत्री शेख अहमद हे १९९९ ते २००५ या काळात कुवेतचे वित्त आणि दळणवळण मंत्री म्हणून, तर २००६ ते २०११ या काळात तेल मंत्री आणि माहिती मंत्री म्हणून कार्यरत होते.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्या सामना होणार आहे. कोलकत्यामध्ये रात्री साडे ७ वाजता ईडन गार्डनवर हा सामना सुरू होईल.

बेंगळुरूमध्ये काल झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबानं रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा २५ धावांनी पराभव केला.

<><><><><>

भारतीय सुपर लिग फुटबॉल स्पर्धेत काल मोहन बगान सुपर जायंटसं नं मुंबई सिटी एफसी संघाला २ -१ असं हरवत २०२३- २४ ची जेतेपदाची ढाल जिंकली आहे. कोलकात्याच्या सॉल्ट लेक स्टेडिअमवर हा सामना झाला. लिस्टन कोलाको आणि जेसन कमिंग्जनं प्रत्येकी एक एक गोल केला. मुंबईच्या संघाचा एकमेव गोल लालीनझुएला चांगटे याने मारला.

<><><><><>

फिडे कॅन्डीडेट्स स्पर्धेत भारताच्या डी. गुकेश यानं क्रमवारीतलं संयुक्त अव्वल स्थान कायम ठेवलं आहे. कॅनडातल्या टोरंटोमध्ये काल त्याचा सामना स्पर्धेत त्याच्यासोबत संयुक्तरित्या अव्वल स्थानी असलेल्या इयान नेपोमिनाची

याच्यासोबत झाला. विदित गुजराथीचा आर. प्रज्ञानंद सोबतचा सामना बरोबरीत सुटला.

<><><><><>

मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये येत्या २४ तासांत उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. आकाश मुख्यतः निरभ्र राहील. या भागात कमाल तापमान ४० अंश सेल्सियस आणि किमान तापमान २६ अंश सेल्सियसच्या आसपास असेल. सांताक्रूझ भागात आज ३७ पूर्णांक ९ अंश सेल्सिअस, कुलाबा इथं ३४ पूर्णांक ७ अंश सेल्सियस तर ठाण्यात ४१ अंश सेल्सियस इतक्या तापमानाची नोंद झाली. मालेगाव इथं ४२ पूर्णांक ६ अंश सेल्सियस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली, तर अमरावती इथं २१ पूर्णांक ३ अंश सेल्सियस हे सर्वात कमी किमान तापमान होते.

देशाच्या मध्य आणि पूर्व भागात तसंच महाराष्ट्रात येत्या ३-४ दिवसांत कमाल तापमानांत ३ ते ४ अंशांनी वाढ होईल. येत्या तीन दिवसांत आंध्र प्रदेश आणि तेलंगणा भागांत तसंच ओडिशा आणि पश्चिम बंगाल भागांत येत्या चार दिवसांत उष्णतेची लाट पसरणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केला आहे. पश्चिम बंगाल, ओडिशा, गुजरात, गोवा आणि कर्नाटकात आज आणि उद्या हवामान उष्ण आणि दमट राहील.

ईशान्य आणि दक्षिण भारतात येत्या २१ तारखेपर्यंत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, तसंच या भागात बर्फवृष्टी, पाऊस आणि विजांच्या कडकडाटासह वादळीवाऱ्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

<><><><><>

आकाशवाणीवरुन राजकीय पक्षांच्या निवडणूक विशेष प्रसारणाला सुरुवात झाली आहे.

त्यामुळे, आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरुन दुपारी ३ वाजता प्रसारीत होणारं प्रादेशिक बातमीपत्र, आज दुपारी ३ ऐवजी संध्याकाळी ४ वाजता प्रसारीत केलं जाईल.

**//<><><><><>//**